शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.०४/२०२५

श्री.संदेश सोपानराव बिचुकले
रा.स्वामी विवेकानंदनगर, प्लॉट नं.३०,
फलटण, जि.सातारा
} तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण
जि.सातारा

२. श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण,
जि.सातारा.
} जाबदार

श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण, जि.सातारा या शिक्षण संस्थेचे नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण येथील सहा.प्राध्यापक श्री.संदेश सोपानराव बिचुकले यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०१/०२/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

तक्रारीचे स्वरूप :

मी महाविद्यालयामध्ये दि.२१/०८/२००४ पासून विशिष्ट कालावधीसाठी सहा.प्राध्यापक म्हणून सेवेत होतो. दि.२५/१०/२०१३ च्या विद्यापीठ निवड समितीव्दारे माझी पूर्णवेळ सहा.प्राध्यापक पदी हिंदी विषयासाठी निवड झाली आहे. दि.०३/०३/२०१४ रूजू दिनांकापासून मी वारंवार मा.प्राचार्य तसेच संस्थेकडे शासन नियमानुसार व नियुक्ती आदेशाप्रमाणे वेतन देण्याची विनंती केली आहे. परंतु त्यांनी अद्याप मला शासन नियमानुसार व नियुक्ती आदेशाप्रमाणे वेतन दिले नाही. मी दि.२६/०२/२०१९ रोजी तसेच दि.१४/०१/२०२५ रोजी मा.प्राचार्य व दि.२२/०१/२०२५ रोजी संस्थेकडे शासन नियमानुसार व नियुक्ती आदेशाप्रमाणे वेतन देण्यासाठी विनंती अर्ज केलेले आहेत. काही अर्ज प्राचार्यांनी पोहोच न देता त्यांच्याकडे ठेवून घेतले आहेत. त्यांनी या अर्जाची कोणतीही दखल घेतली नाही व मला वेतन देण्याची तरतूद केली नाही. सबब मी आपणाकडे तक्रार दाखल करीत आहे. कृपया मला दि.०३/०३/२०१४ पासून शासन नियमानुसार व नियुक्ती आदेशाप्रमाणे माझे सर्व

थकीत वेतन तसेच इथून पुढेही माझे वेतन शासन नियमानुसार व नियुक्ती आदेशाप्रमाणे मिळवून द्यावे ही विंनती.

संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :

१) श्री. बिचुकले यांना सातत्याने अनावश्यक वरिष्ठ कार्यालय व वेगवेगळ्या अधिका-यांकडे तक्रार अर्ज करण्याची सवय आहे. त्यांचे विरुद्ध महिला प्राध्यापकांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे महाविद्यालयाने कोणतीही कारवाई करू नये म्हणून महाविद्यालयावर दबाव आणण्याच्या उद्देशाने सदरचा तक्रार अर्ज दिलेला आहे.

२) श्री. संदेश सोपानराव बिचुकले यांच्या तक्रारीतील कारणे व मागणी चुकीची असून महाविद्यालयास ते मान्य नाही. त्यामुळे श्री. बिचुकले यांचा अर्ज फेटाळण्यात यावा.

३) श्री. बिचुकले यांची दि.०३/०३/२०१४ रोजीची नेमणूक विद्यापीठ निवड समितीव्दारे झालेली आहे. श्री. बिचुकले हे महाविद्यालयात हजर होण्यापूर्वी संस्थेने व महाविद्यालयाने आपले महाविद्यालय कायम विनाअनुदानित असल्याचे सांगून महाविद्यालय जे वेतन देईल ते स्वीकारण्यास तयार असल्यास आपण नोकरीवर हजर व्हावे अशी कल्पना दिलेली होती. त्यांनी ही बाब पूर्णपणे मान्य केल्यानंतरच त्यांना संस्थेने नियुक्ती आदेश दिलेला आहे. त्यानंतर महाविद्यालयाने नियुक्तीपासून आज अखेर श्री. बिचुकले यांना वेतन दिले आणि त्यांनी ते विनातक्रार सदरचे वेतन आजअखेर घेतले आहे. त्यामुळे after thought श्री. बिचुकले यांना त्यांच्या मनाप्रमाणे वाढीव वेतन मागता येणार नाही तसेच त्यांना कायदेशीर अधिकार नाही.

त्याचप्रमाणे एकदा वेतन स्वीकारल्यानंतर पुन्हा त्यांना कायद्याप्रमाणे वाढीव वेतन मागता येणार नाही. त्याबाबतचा त्यांचा अधिकार त्यांनी गमावलेला आहे.

४) श्री. बिचुकले यांनी वरील संदर्भीय अर्ज नऊ वर्षांनंतर दिलेला आहे. त्यामुळे या मागणीस लिमिटेशनची बाधा आली आहे. या लिमिटेशन बाबत श्री. बिचुकले यांनी कोणतेही स्पष्टीकरण अथवा कारण अर्जात नमूद केलेले नाही. The applicant has slept on his right with

inordinate delay- The applicant has loosed his right with inordinate delay- त्यामुळे श्री. बिचुकले यांचा अर्ज लिमिटेशन या मुद्दयावर फेटाळण्यात यावा.

५) आमचे महाविद्यालय कायम स्वरूपी विनाअनुदानित आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाकडून कोणत्याही प्रकारचा Grant in aid मिळत नाही. त्यामुळे महाविद्यालयास विद्यार्थ्यांकडून येणा-या शैक्षणिक फी मधूनच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचार-यांच्या वेतनाचा सर्व खर्च व इतर प्रशासकीय खर्च करावा लागतो. त्यामुळे श्री. बिचुकले यांची मागणी गैरलागू आहे.

६) महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी वेतन आयोग प्रसिद्ध केलेले आहेत. आणि हे वेतन आयोग अनुदानित महाविद्यालयांस लागू होतात. परंतु सदरचे वेतन आयोग कायम विनाअनुदानित महाविद्यालयास लागू होत नाहीत. सेक्रेटरी, महात्मा गांधी मिशन यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये स्पेशल लिव्ह पिटीशन २६५२३ ते २६५२४/२०१२ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने श्री. महेश दत्तात्रय शिवणकर, प्रभारी सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी दि.०५/०४/२०१३ ला ॲफिडेविट दाखल केले असून त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेला सहावा वेतन आयोग कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना लागू नसल्याचे मान्य केलेले आहे.

७) महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या सहावा वेतन आयोगामध्ये सदरचा वेतन आयोग कायम विनाअनुदानित महाविद्यालयास लागू असल्याचे कुठेही नमूद केलेले नाही. त्यामुळे सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे श्री. बिचुकले वेतन मागू शकत नाहीत. त्याचप्रमाणे सहावा वेतन आयोगाच्या जी.आर. मध्ये कोणत्याही विनाअनुदानित महाविद्यालयाचा समावेश केलेला नाही. त्यामुळे श्री. बिचुकले यांची मागणी गैरलागू आहे.

श्री. बिचुकले यांनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांना सहावा वेतन आयोग किती तारखेपासून लागू होतो व किती तारखेपर्यंत मिळावा हे नमूद केलेले नाही. त्यांच्या मागणीचे स्वरूप हे व्हेग आहे. या ही कारणास्तव श्री. बिचुकले यांची मागणी फेटाळण्यात यावी. महाराष्ट्र शासनाने ७ वा वेतन आयोग अनुदानित महाविद्यालयासाठी जाहीर झालेला आहे. परंतु या जी.आर.मध्ये विनाअनुदानित महाविद्यालयाची नावे नमूद नाहीत. यामुळे ७ व्या वेतन आयोगातील तरतुदी श्री.बिचुकले यांना मिळू शकत नाहीत.

८) श्री. बिचुकले यांना महाविद्यालयाने २०१४ पासून आज अखेर वेतन दिलेले आहे त्यावर नियमानुसार प्राव्हिडंड फंड अदा केला आहे. त्याबाबत श्री. बिचुकले यांनी विद्यापीठ किंवा अन्य कोणत्याही ॲथोरीटीकडे कोणतीही तक्रार केलेली नाही. सदरचे वेतनाबददल त्यांना तक्रार नाही. सदरचे वेतन त्यांना मिळालेले आहे.

९) विद्यापीठाच्या शैक्षणिक शुल्क निर्धारण समितीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी ठरवलेली आहे व त्याप्रमाणे फी घेणे महाविद्यालयास बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणा-या शैक्षणिक फीच्या ८० टक्के रक्कम शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनावर आणि २० टक्के रक्कम प्रशासकीय कामकाजासाठी खर्च करणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे महाविद्यालयाने योग्य असे वेतन श्री. बिचुकले यांना दिले आहे. त्यामुळे श्री. बिचुकले यांना वाढीव वेतन मागता येणार नाही. महाविद्यालयाने दिलेले वेतन महाविद्यालयाच्या आर्थिक परिस्थितीनुसार दिले आहे. त्यामुळे श्री. बिचुकले यांनी केलेली मागणी चुकीची आहे.

१०) महाविद्यालयास अत्यल्प शैक्षणिक फी विद्यार्थ्यांकडून प्राप्त होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाकडून भारत सरकार शिष्यवृत्ती द्वारे मिळणारी शैक्षणिक फी प्रलंबित आहे. त्यामुळे महाविद्यालयास आर्थिक अडचणीस सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. महाविद्यालयास मोठ्या प्रमाणात आर्थिक तोटा होत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

अ.क्र	शैक्षणिक वर्ष	तोटा रक्कम
१	सन २०२१-२२	५,००,६८६.५०
२	सन २०२२-२३	१,०६,१०६.२२
३	सन २०२३-२४	३४,२७,४८०.७१
४	सन २०२४-२५	१८,०७,८६५.००

वरीलप्रमाणे महाविद्यालयास आर्थिक तोटा आहे तरी ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळावी या उद्देशाने सदरचे महाविद्यालय तोटा सहन करून चालविली जात आहे.

११) श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण या संस्थेचे हे एकमेव महाविद्यालय आहे. त्यामुळे इतर कोणत्याही उत्पन्नाची साधने नाहीत. त्याप्रमाणे पारंपरिक महाविद्यालय असल्याने त्यामध्ये स्वतंत्र आर्थिक

स्त्रोत असणारे उपक्रम राबविले जात नाहीत. त्यामुळे महाविद्यालयास विद्यार्थ्यांकडून मिळणा-या शैक्षणिक फी वरच अवलंबून रहावे लागत आहे. त्यामुळे श्री. बिचुकले यांना वाढीव वेतन व वेतन फरक देता येत नाही. महाविद्यालयाच्या आर्थिक परिस्थितीची संपूर्ण जाणीव श्री. बिचुकले यांना आहे. मात्र फक्त त्रास देण्याच्या हेतूने वरील प्रमाणे अर्ज केलेला आहे. त्यामुळे श्री.बिचुकले यांचा अर्ज फेटाळण्यात यावा. श्री.बिचुकले यांनी त्यांच्या अर्जामध्ये सध्याचे वेतन नमूद केलेले नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या अर्जामध्ये किती वेतन मिळावे व वेतन फरक किती मिळावा हे नमूद केलेले नाही. त्यामुळे मुलतः श्री. बिचुकले यांची मागणी व्हेग स्वरूपाची आहे. व त्यास कायदेशीर तरतुदींचा आधार नाही.

१२) महाविद्यालयाने विद्यापीठाच्या शैक्षणिक शुल्क निर्धारण समितीकडे विद्यार्थ्यांच्या वाढीव फी साठी अर्ज सादर केले होते व त्याप्रमाणे समितीने फी वाढ ठरवून दिलेली आहे व त्या शैक्षणिक फी च्या आधारे महाविद्यालयाने शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन दिलेले आहे. वस्तुस्थिती श्री. बिचुकले यांना माहिती आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या शुल्क निर्धारण समितीच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक फी घेणे बंधनकारक असल्याने श्री. बिचुकले यांना वाढीव वेतन देता येणार नाही.

१३) वेतन ठरविण्याचा अधिकार महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास आहे व त्याप्रमाणे महाविद्यालयाने श्री. बिचुकले यांना वेतन दिलेले आहे. श्री. बिचुकले यांनी सन २०१४ पासून वेतन घेताना आज अखेर कोणतीही हरकत नोंदविलेली नाही. त्यामुळे श्री. बिचुकले यांची मागणी बेकायदेशीर आहे.

१४) श्री. बिचुकले यांची तथाकथित थकित वेतनाची मागणी मुदतबाह्य आहे. त्यामुळे त्यांची थकित वेतनाची मागणी फेटाळण्यात यावी.

१५) श्री. बिचुकले यांनी त्यांच्या अर्जामध्ये केलेली मागणी ही कोणत्या शासन निर्णयाने केलेली आहे असे नमूद केलेले नाही. त्यामुळे व्हेग मागणी मंजूर करता येत नाही.

वरील कारणास्तव श्री. बिचुकले यांचा अर्ज फेटाळण्यात यावा ही नम्र विनंती.

समितीची निरीक्षणेः-

तक्रारदाराने त्यांच्या नियुक्तीच्या तारखेपासून विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे विहित केलेल्या आणि महाराष्ट्र राज्य शासन व शिवाजी विद्यापीठाने स्विकारलेल्या वेतनश्रेणीनुसार नियमित वेतन आणि त्याची थकबाकी मिळण्याची मागणी केली आहे. तक्रारदार यांची नियुक्ती जाबदार संस्थेच्या महाविद्यालयात हिंदी विषयाचे पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापक म्हणून दि.०३/०३/२०१४ पासून नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती विद्यापीठाच्या निवड समितीद्वारे दि.२५/१०/२०१३ रोजी झाली होती. तक्रारदार यांचेनुसार त्यांच्या दि.०३/०३/२०१४ रोजीच्या नियुक्ती आदेशामध्ये रू.१५६००-३९१०० एजीपी ६००० अशी वेतनश्रेणी नमूद केली आहे. सदर नियुक्तीला शिवाजी विद्यापीठाने दि.०३/०१/२०१७ रोजीच्या पत्राने मान्यता दिली आहे. जाबदार क्रं. १ शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेले कायमस्वरूपी विनाअनुदानित महाविद्यालय आहे. तक्रारदाराने सदरची तक्रार त्यांच्या नियुक्ती आदेशामध्ये वेतनाबाबत स्पष्टपणे नमूद असूनही त्यांना लागू असलेल्या ६ व्या व ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतन दिलेले नाही.

तक्रारदार यांनी या समितीसमोर सादर केलेला लेखी युक्तीवाद व कागदपत्रे अवलोकनी घेतली असता, दि.०३/०३/२०१४ चा नियुक्ती आदेश हा संस्था व शिक्षकांमधील करार असून त्यामधील अटी दोन्ही पक्षांना बंधनकारक आहेत. त्यात नमूद केलेल्या वेतनश्रेणीनुसार वेतन मिळणे हा त्यांचा कायदेशीर हक्क आहे. जाबदार क्रं.२ शिवाजी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतूदींचे पालन होणे आवश्यक आहे. कलम १०८ (१) (फ) नुसार महाविद्यालयाची संलग्नतेबाबतची ही अनिवार्य अट आहे. शिवाजी विद्यापीठाचे दि.२९/१०/२००९ व दि.०२/०४/२०१९ रोजीच्या आदेशामध्ये ६ व्या व ७ व्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीचे आदेश दिले आहेत. त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या म्हणण्याच्या पृष्ठयार्थ मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ मधील रिट पिटीशन क्र. ११०९१/२०१० (भारतीय कामगार सेना व इतर विरूध्द विद्यापीठ अनुदान आयोग व इतर) या निर्णयाचा आधार घेतला आहे. ज्यामध्ये विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये ६ वा वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाचे हे आदेश सिव्हिल अपील क्रमांक

११५-११६/२०१७ (सचिव महात्मा गांधी मिशन व इतर विरूध्द भारतीय कामगार सेना व इतर) मध्ये कायम ठेवले आहेत. तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीस मुदतीची बाधा येत नसल्याचे कथन केले आहे. नियमानुसार वेतन न देणे ही सततची चूक 'Continuous Wrong' आहे ही बाब एम. आर. गुप्ता विरूध्द् युनियन ऑफ इंडिया व इतर या न्याय निवाडयामध्ये स्पष्ट झाली आहे. सबब तक्रारदार यांना नियमानुसार असलेले वेतन देय आहे व त्यास जाबदार संस्था व महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार आहेत, असे विस्तृत म्हणणे तक्रारदार यांनी या समितीसमोर मांडले आहे.

जाबदार संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या तक्रारीस विरोध केला आहे. तक्रारदार यांनी तक्रार नऊ वर्षांपेक्षा जास्त उशिरा दाखल केली आहे. या विलंबाकरिता कोणतेही कायदेशीर कारण त्यांनी दिलेले नाही, म्हणून ती फेटाळण्यास पात्र आहे. वेतन आयोगाची बाब अनुदानित महाविद्यालयांना लागू आहे, कायमस्वरूपी विनाअनुदानित महाविद्यालयांना लागू नाही. या संदर्भात राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयातील एसएलपी क्र.२६५२३-२६५२४/२०१२ मध्ये प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. तक्रारदार यांना महाविद्यालयातील विनाअनुदानित स्थितीची माहिती होती आणि त्यांनी व्यवस्थापनाने देवू केलेले वेतन स्विकारले आहे. अनेक वर्ष कोणताही विरोध न करता त्यांनी ते वेतन स्विकारलेमुळे आता त्यांनी जास्त वेतन मागणी करण्याचा हक्क सोडला आहे. त्यामुळे ही तक्रार करण्यास प्रतिबंधित आहेत. महाविद्यालयाला गंभीर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो आहे. ग्रामीण आणि आर्थिकदृष्टया दुर्बळ विद्यार्थ्यांकडून प्राप्त केलेल्या शुल्कावर ते पूर्णपणे अवलंबून आहे. शुल्क वाढीचा प्रस्ताव विद्यापीठाच्या शुल्क निर्धारण समितीकडे प्रलंबित आहे. सबब कोणताही आर्थिक भार महाविद्यालयास धोका निर्माण करेल. नियुक्ती आदेशामधील यूजीसी नुसार वेतनश्रेणीचा उल्लेख अजाणतेपणी चूक झाली आहे. अनुदानित संस्थांच्या नमुन्याची नक्कल केली असल्यामुळे सदर चूक झाली आहे. त्यामुळे हा नियुक्ती आदेश रद्दबातल ठरतो. सबब, तक्रारदार त्यावर आधारीत दावा करू शकत नाही. तक्रारदाराने आधार घेतलेला भारतीय कामगार सेना व इतर विरूध्द विद्यापीठ अनुदान आयोग व इतर (वर नमूद) मधील निर्णय केवळ व्यवसायिक आणि वैद्यकीय महाविद्यालय यांना लागू आहे. जाबदार हे पारंपारीक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय आहे. तक्रारदार यांनी ही तक्रार महिला कर्मचाऱ्यांशी गैरवर्तनाबाबत दाखल केलेल्या तक्रारीवर आधारीत चौकशी प्रलंबित असताना हेतूपरस्पर व दबाव तंत्र निर्माण करणेकरीता केली आहे, असे म्हणणे संस्था व महाविद्यालयाने

समितीसमोर मांडले. तसेच तक्रारदार यांनी त्यांच्या लेखी युक्तिवादासोबत जोडलेला थर्कीत वेतनाचा तक्ता संस्था, महाविद्यालयाने नाकारला आहे.

दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेवून समितीच्या असे निदर्शनास आले की, श्री.महेश शिवणकर प्रभारी सहसंचालक, महाराष्ट्र शासन यांनी मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्रं. २६५२३-२६५२४/२०१२ मध्ये दि.०५/०४/२०१३ रोजी दाखल केलेले प्रतिज्ञापत्र जाबदार यांनी या समितीसमोर सादर केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेला सहावा वेतन आयोग कायम विना अनुदानित महाविद्यालयांबाबत नसलेचे नमूद केले आहे. त्याचा आधार जाबदार घेत आहेत. तथापि, समितीच्या मतानुसार एखाद्या विशिष्ट प्रकरणात सादर केलेले प्रतिज्ञापत्र हे नियम अथवा कायद्याच्या स्वरूपात ग्राहय धरता येत नाही. त्यामुळे या प्रतिज्ञापत्राचा विचार या प्रकरणाच्या निर्णयासाठी निर्णायक आधार म्हणून करता येणार नाही.

तक्रारदार यांनी सादर केलेले दस्ताऐवज, संचालक, महाविद्यालय व विद्यापीठे विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शिक्षकांना सुधारीत वेतन लागू करण्याबाबतचे पत्र दि.२९/१०/२००९ व त्याचप्रमाणे शासनाचे अहवाल सातवा वेतन लागू केलेचे शासन निर्णयातील शिफारशीनुसार *"The revised pay scales and other measures to improve and standards in higher education are applicable to all categories of full time teachers/librarians/director/physical education employed by the non-agricultural universities, national law universities, deemed to be universities, non-government aided/unaided colleges in the faculties of arts, sciences, commerce etc."* विनाअनुदानीत महाविद्यालयांना सुधारीत वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. त्यामुळे जाबदार यांचे म्हणण्यानुसार सुधारीत वेतन आयोग विना अनुदानीत महाविद्यालयांना लागू होत नाही या म्हणण्यात तथ्य नाही.

जाबदार यांचा युक्तीवाद की, नियुक्ती आदेशात वेतनश्रेणीचा उल्लेख चूकीचा झाला होता व तो आदेश रद्दबातल आहे. जाबदार यांच्या या म्हणण्यास कोणताही कायदेशीर आधार नाही. तक्रारदार यांच्या नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता आहे व नियुक्तीपासून तक्रारदाराने सेवा बजावली आहे ही बाब

जाबदार नाकारत नाहीत. सबब नियुक्ती आदेश एकतर्फी रद्दबातल घोषित होवू शकत नाही. जाबदार यांच्या विनाअनुदानित महाविद्यालयाची आर्थिक अडचण असली तरी कर्मचाऱ्याचे कायदेशीर देय त्यांना नाकारता येणार नाहीत.

जाबदार यांनी तक्रारदार यांची मागणी मुदतीत नाही व त्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते अशी हरकत नोंदवली आहे. त्यावर तक्रारदार यांनी एम.आर.गुप्ता विरूध्द भारत सरकार सिव्हिल अ.नं.७५१०/१९९५ या निवाडयाचा आधार घेतला आहे. त्यामध्ये पुढीलप्रमाणे निरिक्षणे नोंदविली आहेत. *"So long as the appellant is in service, a fresh cause of action arises every month when he is paid his monthly salary on the basis of a wrong computation made contrary to rules.*

"This right of a Government servant to be paid the correct salary throughout his tenure according to computation made in accordance with rules, is akin to the right of redemption which is an incident of a subsisting mortgage and subsists so long as the mortgage itself subsists, unless the equity of redemption is extinguished. It is settled that the right of redemption is of this kind."

वरील निरीक्षणानुसार तक्रारदार हे अद्याप सेवेत असून त्यांना सुधारीत वेतन मागण्याचा अधिकार प्राप्त होत असलेने मुदतीचे कायद्याची बाधा येत नाही व तक्रारदार यांनी सादर केलेली व वर उल्लेख केलेले निवाडे यामध्ये नोंदविलेली निरिक्षणे तक्रारदार यांच्या या प्रकरणाशी तंतोतंत लागू पडणारी आहेत.

उपरोक्त सर्व बाबी अवलोकनी घेता समिती या निष्कर्षास येते की, तक्रारदार यांचा नियुक्ती आदेश जाबदार यांचेवर बंधनकारक असून तक्रारदार यांनी आधार घेतलेल्या विविध न्यायनिवाडयानुसार तक्रारदार नियमानुसार देय असणाऱ्या वेतनास पात्र आहेत. नियुक्ती आदेशामध्ये नमूद केलेले वेतन मिळण्याचा तक्रारदार यांचा हक्क संपूर्ण सेवा कालावधीत कायम आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १०८ (१) (फ) नुसार नियमानुसार वेतन देणे ही जाबदार यांची जबाबदारी आहे. शिवाजी विद्यापीठाचे ६ वा व ७ वा वेतन आयोगाची अंमलबजावणी करणारे आदेश हे त्यांना लागू आहेत. सबब जाबदार यांनी नियमानुसार वेतन व विहित वेतनश्रेणी देणे बंधनकारक आहे. सबब, ही समिती या निर्णयास येते की, तक्रारदार यांनी त्यांची तक्रार यशस्वीरीत्या सिध्द् केली आहे. करिता ही समिती खालील आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. तक्रार अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. तक्रारदार यांना संस्थेने दिलेल्या नियुक्ती आदेशानुसार वेतन व विहित वेतनश्रेणी लागू करावी.

३. जाबदार यांनी तक्रारदार यांच्या नियुक्ती आदेशामध्ये नमूद केलेनुसार त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून त्यांना देय केलेले वेतन वजा करून उर्वरीत देय वेतनाची थकबाकी हा आदेश प्राप्त झाले पासून ३ महिन्याचे आत तक्रारदारास अदा करावी.

झालेल्या निकालाच्या प्रती संबधितांना देवून तसे कळविण्यात यावे.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

दिनांक : 18 JUN 2026

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.ए.बी.साळी)

अध्यक्ष
(श्री.एस.एन.पाटील)